SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000, www.unishivaji.ac.in

# विद्यार्थी विकास विभाग

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

Dr. S. G. Ghane
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/५६७ | दि. ०५/०९/२०२६

प्रति,

**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्न महाविद्यालये व सर्व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :– जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव २०२६–२०२७ ऑनलाईन प्रवेशिका भरणेसाठी मुदतवाढ देणेबाबत तसेच आयोजक यजमान महाविद्यालये व स्पर्धेच्या तारखांबाबत.**

**संदर्भ :–** संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/५३२, दि. १७/०८/२०२६ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार शिवाजी विद्यापीठाचा ४६ वा युवा महोत्सव २०२६–२०२७ द्विस्तरीय पध्दतीने आयोजित करण्याबाबत आपणास कळविण्यात आले आहे. तसचे जिल्हास्तरीय व मध्यर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी ऑनलाईन पोर्टलव्दारे प्रवेशिका दि. ०७/०९/२०२६ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत भरण्याबाबतही कळविण्यात आले होते. याबाबत बऱ्याच महाविद्यालयांनी दुरध्वनीद्वारे ऑनलाईन प्रवेशिका भरणेसाठी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने खालील मुद्दांची नोंद घ्यावी.

१. **जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी ऑनलाईन पोर्टलव्दारे प्रवेशिका भरणेसाठी दि. १२/०९/२०२६ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. दि. १२/०९/२०२६ नंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. तसेच ऑनलाईन प्रवेशिका भरली नसलेस ऐनवेळी स्पर्धेमध्ये सहभागी करुन घेण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

२. उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार सांगली जिल्हास्तरीय युवा महोत्सवाची तारीख दि. २७/०९/२०२६ हि कळविण्यात आली होती. परंतू काही तांत्रिक कारणास्तव सांगली जिल्हास्तरीय युवा महोत्सव दि. २८/०९/२०२६ रोजी आयोजित करण्यात येणार आहे. तरी सांगली जिल्हयामधील सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी यांची नोंद घ्यावी.

३. सन २०२६–२०२७ मधील ४६ व्या युवा महोत्सवामधील जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सव आयोजक महाविद्यालयाची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| जिल्हा | आयोजक महाविद्यालयाचे नाव | तारीख |
|---|---|---|
| सांगली | राजे रामराव महाविद्यालय, जत | २८/०९/२०२६ |
| कोल्हापूर | जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर | २९/०९/२०२६ |
| सातारा | बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण | ०१/१०/२०२६ |
| मध्यवर्ती | मुधोजी कॉलेज, फलटण | ०६/१०/२०२६ ते ०९/१०/२०२६ |

४. जर स्पर्धेदरम्यान एखाद्या महाविद्यालयास काही कारणास्तव स्पर्धक कलाकाराच्या बदली दुसरा कलाकार घ्यावयाचा असल्यास **सदर कलाकार बदली पत्र योग्य त्या कारणासह ३ प्रतीमध्ये असणे आवश्यक आहे.** त्यामधील एक प्रत आयोजक महाविद्यालयाकडे, एक प्रत विद्यापीठाकडे राहिल व स्थळप्रत संबंधित महाविद्यालयाकडे राहिल.

५. **जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवावेळी आयोजक महाविद्यालयामध्ये नोंदणी करतेवेळी ऑनलाईन पध्दतीने नोंदणी केलेली कलाप्रकारनिहाय यादी व सोबत खाली नमुद कागदपत्रांची झेरॉक्स प्रत (सांक्षाकित करुन) सादर करणे आवश्यक आहे.**

**अ. सहभागी विद्यार्थ्यांचे ओळखपत्र** (चालु वर्षाची नोंदणीसह मा. प्राचार्य यांच्या सही असणे आवश्यक)

**ब. चालू वर्षातील प्रवेश पावती**

**क. दहावी बोर्ड प्रमाणपत्र/जन्मदाखला**

**ड. गतवर्षीच्या निकालाची प्रत**

६. युवा महोत्सव नियमावलीमध्ये दिलेले 'सादरीकरणाबाबत द्यावयाचे हमीपत्र' संघव्यवस्थापक व प्राचार्य यांच्या सहीने सादर करणे अनिवार्य आहे.

तसेच या विभागाच्या उपरोक्त संदर्भिय दि.१७/०८/२०२६ रोजीच्या पत्रामध्ये नमूद मुददयानुसार ऑनलाईन प्रवेशिका भरणेची कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

5/9

संचालक
विद्यार्थी विकास

सोबत : सादरीकरणाबाबत द्यावयाचे हमीपत्र नमुना